


दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३७४ वा मंगळवार दि २६ मे २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये


# काळजाला सुन्न करणारी धक्कादायक घटना...

## वडीलानी आपल्या चार गोंडस मुलांना विहिरीत ढकलून स्वत:ही केली आत्महत्या

**जनसंचलन जळगाव जा**

सोमवार (२५ मे) दिवस हा दिवस आदिवासी बहुल जळगाव जामोद तालुक्यासह संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यासाठी काळा सोमवारफ ठरला. संपूर्ण जिल्ह्याला हादरवून टाकणारी एक अत्यंत हृदयद्रावक घटना समोर आली आहे. जळगाव जामोद तालुक्यातील राजुरा हे गाव या घटनेमुळे सुन्न झाले असून, संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.नवरा-बायकोच्या कौटुंबिक भांडणातून पत्नी माहेरी निघून गेल्याने, घरात एकट्या राहिलेल्या पित्याने आपल्या चार निष्पाप मुलांना विहिरीत ढकलून दिले आणि नंतर स्वत:ही आत्महत्या केली. काळजाचा थरकाप उडवणाऱ्या या घटनेत चार कोवळ्या आणि निष्पाप मुलांसह वडिलांचाही अंत झाल्याने राजुरा गावासह संपूर्ण जिल्हा हळहळत आहे.या दुर्दैवी घटनेत विजय मुसा किराडिया (३५, वडील), प्रीत विजय किराडिया (७), प्राची विजय किराडिया (५), पूर्वी विजय किराडिया (४) आणि पीयूष विजय किराडिया (२) अशी मृत पावलेल्यांची नावे आहेत. ही घटना जळगाव जामोद तालुक्यातील भाले अंजन गावच्या शिवारात घडली. प्राप्त माहितीनुसार, काल रविवारी (२४ मे) संध्याकाळी विजय किराडिया आणि त्यांच्या पत्नीमध्ये कौटुंबिक कारणावरून कडाक्याचे भांडण झाले होते. या भांडणामुळे संतप्त झालेली पत्नी मुलांना घरातच सोडून जवळच असलेल्या इस्लामपूर या आपल्या माहेरी निघून गेली. पत्नी निघून गेल्यामुळे विजय प्रचंड मानसिक तणावाखाली होता. आज सोमवारी सकाळी उठल्यावर विजयने मुलांना चहा करून पाजला. त्यानंतर तो घराबाहेर चहाची भांडी घासण्यासाठी बसला होता. त्याच वेळी विजयचे वडील तिथे आले. विजयला स्वतः घरातली कामे करताना पाहून त्यांनी विचारले, तू का कामे करतोयस? बायको कुठे गेली आहे? वडिलांच्या या प्रश्नामुळे विजयचा मानसिक ताण आणि राग आणखी वाढला.त्यानंतर रागाच्या भरात विजय आपल्या चारही चिमुकल्यांना घेऊन जवळच्या एका शेतातील विहिरीवर गेला. तिथे त्याने दोन मुले आणि दोन मुलींना जिवंत विहिरीत ढकलून दिले. त्यानंतर स्वतः विहिरीच्या कडेला दोरीच्या साहाय्याने गळफास लावून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला; परंतु वजनामुळे दोरी तुटली आणि विजय देखील विहिरीत पडला. यात पाचही जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.काही वेळानंतर संबंधित शेताचे मालक तिथे आले असता, त्यांना विहिरीच्या





काठावर मोबाईल, चपला आणि कापलेली दोरी आढळून आली. संशय आल्याने त्यांनी विहिरीत डोकावून पाहिले असता हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती मिळताच जळगाव जामोद पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पाचही मृतदेह विहिरीबाहेर काढले. हे सर्व मृतदेह शवविच्छेदनासाठी जळगाव जामोद येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# चिखलीत ५.२५ कोटींच्या जमीन व्यवहारात मोठा गेम?

## खरेदीखतात फक्त १ कोटी दाखवून तब्बल २१ लाखांचा मुद्रांक शुल्क घोटाळ्याचा आरोप!

**जनसंचलन चिखली**

तालुक्यातील केळवद येथील तब्बल ६ हेक्टर ९२ आर जमीन व्यवहारावरून मोठा वाद उफाळून आला असून, ५ कोटी २५ लाखांच्या कथित व्यवहारात शासनाची लाखो रुपयांची फसवणूक झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. सुधाकर पुंडलिक खरात यांनी दिलेल्या तक्रारीनुसार,धनंजय संपतराव सावंत व निर्मला सावंत यांनी १६ मे २०२४ रोजी नोटरीद्वारे ५.२५ कोटी रुपयांचा विक्री करार केला होता. त्यावेळी १ कोटी ७५ लाख रुपये ॲडव्हान्स दिल्याचाही दावा करण्यात आला आहे. मात्र, पुढे २२ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आलेल्या खरेदीखतात केवळ १ कोटी रुपयांचा व्यवहार दाखवण्यात आल्याचा धक्कादायक आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. यामुळे शासनाचे तब्बल २१ लाख २० हजार रुपयांचे मुद्रांक शुल्क बुडवण्यात आल्याचा दावा अर्जदारांनी केला आहे.या प्रकरणात दुय्यम निबंधक चिखली कार्यालयाचीही दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप असून, संपूर्ण व्यवहाराची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, कारवाई न झाल्यास प्रकरण थेट आयकर विभाग, जिल्हाधिकारी, मंत्रालय आणि सोशल मीडियापर्यंत नेण्याचा इशाराही तक्रारदारांनी दिला आहे. त्यामुळे चिखलीतील हा कोट्यवधींचा जमीन व्यवहार आता जिल्हाभर चर्चेचा विषय ठरत आहे. या प्रकरणात प्रशासन काय भूमिका घेणार? शासन महसुलाला फटका बसला का? आणि




या व्यवहारामागे नेमकं कोणाचं ङआशीर्वादफ आहे? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ....माहिती व निर्णयस्वातंत्र्य....

आपले नाव, जन्मतारीख, पत्ता, मोबाइल क्रमांक, आपले बँक तपशील अशी वैयक्तिक माहिती आपण अनेक ठिकाणी देत असतो. माहिती दिल्यानंतरच्या काही काळातच आपल्याला अनोळखी क्रमांकांवरून दूरध्वनी येऊ लागतात, संदेश येतात आणि आपल्या सवयी, आवडीनिवडींनुसार जाहिरातीही दिसू लागतात. हा निव्वळ योगायोग नसतो. दिलेली माहिती कुठेतरी साठवली जाते आणि तिचा वापरही केला जातो. मग प्रश्न उभा राहतो, आपली माहिती कशी वापरली जाते, यावर आपले काही नियंत्रण आहे का? या प्रश्नाचे उत्तर गोपनीयतेचा अधिकार या संकल्पनेत दडलेले आहे. गोपनीयतेचा अधिकार म्हणजे माहिती दडवणे नव्हे. एखाद्या वेळी माहिती देणे अपरिहार्य असते; पण ती कशी, कुणासाठी आणि कोणत्या मर्यादेत वापरली जाईल, यावर व्यक्तीचे नियंत्रण असणे, हाच या अधिकाराचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे हा अधिकार नक्की काय आहे, त्याअंतर्गत आपल्याला आपल्याच माहितीवर नियंत्रण मिळते का, या बाबी समजून घेणे आवश्यक आहे. गोपनीयतेचा स्वतंत्र मूलभूत अधिकार राज्यघटनेत अंतर्भूत नसल्याचा स्पष्ट निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने सन १९५४मध्ये एम. पी. शर्मा आणि १९६२मध्ये खडकसिंग प्रकरणात दिला होता. मात्र, पुढील काळात न्यायालयाचा दृष्टिकोन हळूहळू बदलत गेला. व्यक्तीच्या खासगी आयुष्यातील हस्तक्षेपाबाबत न्यायालयाने काही प्रकरणात चिंता व्यक्त केली. मात्र गोपनीयतेच्या अधिकाराला मूलभूत अधिकार म्हणून स्पष्ट मान्यता दिली नव्हती. पुढे आधार योजनेविरुद्ध दाखल झालेल्या याचिकेच्या निमित्ताने हा प्रश्न ऐरणीवर आला आणि त्यातूनच या अधिकाराला मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. आधार योजनेअंतर्गत नागरिकांच्या बोटांचे ठसे, आयरिस स्कॅन यासारखी बायोमेट्रिक माहिती मोठ्या प्रमाणावर जमा केली जाऊ लागली. ती माहिती रेशन, बँक खाते, मोबाइल सिम अशा विविध सेवांशी जोडली जाऊ लागली. या माहितीची सुरक्षा व नियंत्रण यांविषयी अनेक प्रश्न निर्माण झाले. ही योजना गोपनीयतेच्या अधिकाराचा भंग करते म्हणून तिला आव्हान देणारी याचिका माजी न्यायमूर्ती के. एस. पुट्टुस्वामी यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. सर्वप्रथम गोपनीयतेचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे का, हे ठरवणे आवश्यक असल्याने प्रकरण नऊ न्यायमूर्तींच्या घटनापीठाकडे वर्ग करण्यात आले. घटनापीठाने २०१७ साली ऐतिहासिक निकाल दिला व गोपनीयतेचा अधिकार हा राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ अंतर्गत मूलभूत अधिकार असल्याचे जाहीर केले. शरीराशी संबंधित गोपनीयता म्हणजे बायोमेट्रिक किंवा वैद्यकीय माहिती; माहितीशी संबंधित गोपनीयता म्हणजे मोबाइल क्रमांक, बँक तपशील किंवा पत्ता; आणि वैयक्तिक निर्णयाशी संबंधित गोपनीयता म्हणजे धर्म, लग्न किंवा जीवनशैली, असे गोपनीयतेच्या अधिकाराचे तीन पैलू आहेत. या अधिकारावरील कोणताही हस्तक्षेप कायद्याआधारेच, वैध उद्देशासाठी आणि गरजेपुरताच असावा, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. दरम्यानच्या काळात आधार योजनेसाठी संसदेने २०१६मध्ये कायदा केल्याने त्याची वैधता तपासण्यासाठी प्रकरण पाच सदस्यीय घटनापीठाकडे वर्ग करण्यात आले. पाच सदस्यीय घटनापीठातील बहुमताच्या निकालाने आधार कायदा अंशतः वैध ठरविला. सरकारी कल्याणकारी योजनांसाठी, आयकर विवरणपत्रासाठी आधारची अनिवार्यताही वैध ठरवली. पॅन-आधार जोडणीलाही मान्यता दिली. मात्र खासगी कंपन्यांना आधार प्रमाणीकरण करण्याची परवानगी देणारी तसेच इतर काही तरतुदी रद्द केल्या. बँक खाते उघडणे, मोबाइल सिम घेणे यासारख्या बाबींसाठी आधार अनिवार्य करता येणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले. सक्षम विदा (डेटा) संरक्षण कायदा लागू करण्याची आवश्यकताही न्यायालयाने अधोरेखित केली. न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी अल्पमतातील निकालात असे मत मांडले की, व्यक्तीची सर्व माहिती एका क्रमांकावर एकत्रित केल्यास तिचा एक डिजिटल आलेख तयार होतो आणि पुरेशा संरक्षण उपाययोजना नसल्यामुळे संपूर्ण आधार योजनाच घटनाबाह्य ठरते. मग ऐच्छिक असलेल्या ठिकाणीसुद्धा अजूनही आधारकार्डच ओळख म्हणून का मागितले जाते? संसदेने २०१९मध्ये आधार कायद्यात दुरुस्ती करून बँका व दूरसंचार कंपन्यांना ग्राहकांची संमती घेऊन आधार आधारित ई-केवायसी करण्याची परवानगी दिली. म्हणजेच बँक खाते उघडणे किंवा सिम घेणे यासाठी आधारच अनिवार्य आहे, असे नाही. ते ऐच्छिक आहे. पर्यायी ओळखपत्र चालते आणि आधार नसल्याने सेवा नाकारता येत नाही. मात्र, ई-केवायसीमुळे काही मिनिटांत ओळख पडताळणी होत असल्याने तोच सर्वांत सोपा पर्याय म्हणून पुढे केला जातो आणि आपणही तोच स्वीकारतो. शिवाय बँक खाते पॅनशी जोडलेले असते आणि पॅन-आधार जोडणी अनिवार्य असल्याने अप्रत्यक्षपणे बँकेतही आधार जोडला जातो. त्यामुळे निवडीचा अधिकार व्यक्तीकडे असला तरी नेहमीच्या व्यवहारांतील सोय पाहता तो कागदावरच राहतो. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर डिजिटल वैयक्तिक विदा संरक्षण कायदा, २०२३ मंजूर करण्यात आला. आपली माहिती कोणाकडे जाते हे जाणून घेण्याचा, चुकीची असल्यास दुरुस्त करण्याचा, उद्देश संपल्यावर हटवण्याचा आणि दिलेली संमती मागे घेण्याचा अधिकार या कायद्याने दिला. संमती देणे जितके सोपे, तितकेच ती मागे घेणेही सोपे असायला हवे, अशी त्यात तरतूद आहे. मुलांबाबत विशेष काळजी घेतली असून अठरा वर्षांखालील मुलांची माहिती वापरण्यापूर्वी पालकांची संमती अनिवार्य आहे आणि त्यांना लक्ष्य करणाऱ्या जाहिरातींवर बंदी आहे. माहिती ज्या उद्देशासाठी दिली, त्याच कारणासाठी वापरण्याचे बंधनही आहे. कायद्याच्या उल्लंघनास कमाल २५० कोटी रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. तक्रारीसाठी आधी संबंधित कंपनी, मग विदा संरक्षण मंडळ आणि अखेर टीडीसॅट न्यायाधिकरण अशी यंत्रणा आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीचे नियम नोव्हेंबर २०२५मध्ये अधिसूचित झाले. मात्र, नागरिकांच्या तक्रारींची दखल घेणे व त्याआधारे प्रत्यक्ष कार्यवाही मे २०२७ पासून सुरू होणे अपेक्षित आहे.






*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# कर्करोगाशी झुंज अन् जनसेवेची धडपड... खासदार स्मिता वाघ दुसऱ्यांदा 'संसद रत्न'

**जळगाव/वृत्तसंस्था**

संसदेच्या कामकाजात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या लोकप्रतिनिधींना दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित संसद रत्न पुरस्कार २०२६ ची घोषणा करण्यात आली आहे. कर्करोगासारख्या गंभीर आजाराशी झुंज देत असतानाही लोकसेवेचा ध्यास न सोडणाऱ्या जळगावच्या खासदार स्मिता उदय वाघ यांचाही पुरस्कारार्थींमध्ये समावेश आहे. त्यांना गेल्या वर्षीही सदर पुरस्काराने गौरविण्यात आले होते.

राजकारणाकडे अनेकदा संशय, टीका आणि अविश्वासाच्या नजरेने पाहिले जाते. लोकप्रतिनिधींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जातात. त्यांच्या कार्यपद्धतीवर चर्चा होते. जनतेच्या अपेक्षा पूर्ण होत नसल्याची भावना व्यक्त केली जाते. मात्र, अशा काळात काही लोकप्रतिनिधी आपल्या कार्यातून, संघर्षातून समाजासमोर वेगळा आदर्श निर्माण करतात. जळगावमधील लोकसभेच्या पहिल्या महिला खासदार स्मिता वाघ त्यापैकीच एक आहेत.

कर्करोगासारख्या गंभीर आजाराशी झुंज देत असतानाही त्यांनी लोकसेवेचा ध्यास सोडला नाही. उपचार सुरू असताना शरीर थकले होते, असह्य वेदना होत्या, मानसिक ताण होता, तरीही त्यांनी जनतेसाठी काम करण्याची आपली जबाबदारी कधीही दुय्यम मानली नाही.



अनेक वेळा रुग्णालयातील उपचार आणि संसदेतील उपस्थिती यामध्ये समतोल साधत त्यांनी कर्तव्याला प्राधान्य दिले. एकीकडे आरोग्याशी सुरू असलेली लढाई आणि दुसरीकडे जनतेच्या प्रश्नांसाठी संसदेत सातत्याने आवाज उठवण्याची जबाबदारी, हा संघर्ष अत्यंत कठीण होता; मात्र त्यांच्या इच्छाशक्तीपुढे प्रत्येक अडथळा लहान ठरला.

संसदेत त्यांनी मतदारसंघातील पाणी, शेती, रोजगार, रेल्वे, विमानतळ, पायाभूत सुविधा, महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि आरोग्याशी संबंधित अनेक प्रश्न प्रभावीपणे मांडले. जळगाव जिल्ह्याच्या विकासासाठी विविध योजनांचा पाठपुरावा करताना त्यांनी सातत्याने केंद्र सरकारकडे मागण्या लावून धरल्या. लोकांच्या समस्या समजून घेऊन त्या शासनापर्यंत पोहोचवण्याची त्यांची कार्यशैली नेहमीच लक्षवेधी ठरली.

अनेक वेळा प्रकृती ठीक नसतानाही त्यांनी जनतेच्या भेटीगाठी घेतल्या, कार्यकर्त्यांशी संवाद साधला. आणि मतदारसंघातील विकासकामांचा आढावा घेतला. त्यांच्या संघर्षाची सर्वाधिक प्रेरणादायी बाब म्हणजे त्यांनी स्वतःच्या वेदनांपेक्षा जनतेच्या समस्यांना अधिक महत्त्व दिले. कर्करोगासारख्या आजारामुळे अनेक जण मानसिकदृष्ट्या खचून जातात; मात्र खासदार वाघ यांनी या परिस्थितीलाच प्रेरणेत रूपांतरित केले. संकटे कितीही मोठी असली तरी धैर्य, सकारात्मकता आणि कर्तव्यनिष्ठा यांच्या जोरावर त्यांवर मात करता येते, हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला. त्यामुळे अनेक महिलांसाठी आणि गंभीर आजाराशी लढणाऱ्या रुग्णांसाठी प्रेरणास्थान बनल्या आहेत.

महिलांनी राजकारणात सक्रिय भूमिका घ्यावी, समाजकारणात पुढे यावे आणि संकटांशी खंबीरपणे सामना करावा, याचे जीवंत उदाहरण म्हणून आता त्यांच्याकडे पाहिले जाते. ग्रामीण भागातील महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. महिलांच्या शिक्षण, स्वावलंबन आणि सुरक्षिततेसाठी त्यांनी सातत्याने भूमिका घेतली. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना सार्वजनिक जीवनात पुढे येण्याची प्रेरणा मिळत आहे. त्यांच्या संसदीय कार्याची दखल घेत त्यांना दुसऱ्यांदा "संसद रत्न" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार केवळ संसदेतील उपस्थितीसाठी किंवा भाषणांसाठी नसून जनतेच्या प्रश्नांबाबत असलेल्या संवेदनशीलतेचा, सातत्यपूर्ण कामाचा आणि प्रभावी नेतृत्वाचा गौरव मानला जातो. संसदेत सक्रिय सहभाग, लोकहिताचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे आणि विकासकामांबाबत सातत्याने पाठपुरावा करणे, या सर्व बाबींमुळे त्यांना हा सन्मान प्राप्त झाला आहे. विशेष म्हणजे गंभीर आजाराशी लढत असतानाही त्यांनी आपली कार्यक्षमता आणि जनसेवा अबाधित ठेवली, ही बाब अधिक प्रेरणादायी ठरते. स्मिता वाघ २००२ ते २०१५ या कालावधीत त्या जळगाव जिल्हा परिषदेत सदस्य होत्या. दरम्यानच्या काळात त्यांनी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाची धुराही सांभाळली होती. याशिवाय, २०१७ मध्ये त्या महाराष्ट्र विधान परिषदेच्या सदस्या होत्या. २०२४ पासून त्या लोकसभेत जळगावचे प्रतिनिधित्व करत आहेत.

## बंगालमध्ये घुसखोरांसाठी स्थानबद्धता केंद्रे

**कोलकाता/वृत्तसंस्था**

घुसखोरांविरोधात मोहिमेच्या पार्श्वभूमीवर, पश्चिम बंगालमधील भाजप सरकारने सर्व जिल्ह्यांना बेकायदा वास्तव्य करणाऱ्या परदेशी नागरिकांसाठी तात्पुरती स्थानबद्धता केंद्रे उभारण्याचे निर्देश दिले आहेत. निवडणुकीपूर्वी प्रचारात भाजपने हा मुद्दा केंद्रस्थानी ठेवला होता.

संबंधित नागरिकांच्या हद्दपारीची औपचारिकता पूर्ण होईपर्यंत त्यांना ठेवण्यासाठी या केंद्रांमध्ये आवश्यक सुविधा निर्माण करण्याचा आदेश गृहविभागाने दिला आहे. मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी घुसखोरांविरोधात कठोर धोरण अवलंबले जाईल हे वारंवार स्पष्ट केले आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने गेल्या वर्षी मे महिन्यात जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार ही कारवाई केली जात असल्याचे सरकारने स्पष्ट केले. बेकायदा वास्तव्याच्या संशयावरून ताब्यात घेतलेले आणि ज्यांच्या हद्दपारीची प्रक्रिया



सुरू आहे, अशा परदेशी नागरिकांसाठी तात्पुरती संक्रमण सुविधा म्हणून ही केंद्रे काम करतील. केंद्राच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, ताब्यात घेतलेल्या संशयितांच्या कागदपत्रांची पडताळणी होईपर्यंत येथे ३० दिवसांपर्यंत ठेवता येईल. नागरिकत्व निश्चितीबाबतचा निर्णय जिल्हाधिकारी किंवा समकक्ष दर्जाचे अधिकारी घेतील. पश्चिम बंगालच्या राजकारणात तत्कालीन तृणमूल सरकारविरोधात भाजपने घुसखोरीच्या मुद्द्यावर जोरदार प्रचार केला होता.

## "देवेंद्र फडणवीस यांचा आमदार संजय गायकवाड प्रकरणात दबाव", 'शिवाजी कोण होता?'चे प्रकाशक प्रशांत आंबी यांचा आरोप

**नाशिक/वृत्तसंस्था**

'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाच्या शीर्षकावरून एप्रिल महिन्यात वादळ उठले होते. पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) आमदार संजय गायकवाड यांनी धमकावले होते. गायकवाड यांनी आंबी यांच्या विरोधात वापरलेल्या अनुचित भाषेचा अनेकांनी निषेध केला होता. या प्रकरणात संजय गायकवाड यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याची मागणी आंबी यांनी केलेली असताना कोल्हापूर सत्र न्यायालयाने संजय गायकवाड यांच्या पोलीस चौकशीला परवानगी दिली. दुसरीकडे, प्रशांत आंबी यांनी आपणास अजूनही आमदार गायकवाड यांच्या कार्यकर्त्यांकडून धमक्या देण्यात येत असल्याचे म्हटले आहे.

या पुस्तकावरून याआधीही वाद झालेला आहे. एप्रिल महिन्यात बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी पुस्तकाच्या शीर्षकावर आक्षेप घेत प्रकाशक प्रशांत आंबी यांना अश्लील शिवीगाळ आणि धमकी दिल्याची कथित ऑडिओ क्लिप समाज माध्यमात आली होती. त्यानंतर प्रशांत आंबी यांनी कोल्हापूरमधील राजारामपुरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. आमदार गायकवाड यांनी पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराज यांची बदनामी करण्यात आल्याचा आणि महाराजांचा खोटा इतिहास दाखविण्यात आल्याचा आरोप केला होता. पुस्तकात अनेक वेळा शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केल्याचेही त्यांनी म्हटले होते. आंबी यांनी संजय गायकवाड यांची चौकशी व्हावी, या मागणीसाठी कोल्हापूर सत्र न्यायालयात धाव घेतली होती. गायकवाड यांच्या चौकशीची परवानगी न्यायालयाने दिली. प्रशांत आंबी रविवारी नाशिक येथे आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना संजय गायकवाड यांच्या कार्यकर्त्यांकडून आजही धमक्यांचे फोन येत असल्याचे सांगितले. आमदार संजय गायकवाड यांनी ऑडिओ क्लिपमधील

आवाज आपलाच होता, असे म्हटले होते. धमकीचा फोन त्यांचाच होता. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे.अजूनही त्यांच्या कार्यकर्त्यांचे फोन मला येत आहेत. आई-बहिणीवरून शिव्या देत आहेत. आम्ही त्यांच्या धमक्यांना भीक घालत नाही. परंतु,आता पोलीस या प्रकरणात गंभीर होणार आहेत का, असा माझा सवाल आहे. याआधी आम्ही तक्रार दिली नव्हती. काही तरुण हे स्पर्धा परीक्षा देणारे होते. मात्र आता त्यांचे धाडस वाढत आहे. मला चार दिवसापूर्वी देखील धमकीचा फोन आला. सोमवारी लेखी अर्ज कोल्हापूर पोलिसांना देणार आहे. कॉम्रेड गोविंद पानसरेंना न्याय मिळाला की नाही हा संपूर्ण महाराष्ट्र बघतोय. आमचा न्यायव्यवस्थेवर विश्वास आहे. परंतु, आमचा पोलिसांवर अजिबात विश्वास नाही, पोलीस जे पुरावे कोर्टासमोर आणतील त्यावरच कोर्ट निर्णय देईल, असे प्रशांत आंबी यांनी नमूद केले.

## "कॉक्रोच जनता पार्टीविषयी भाजपला भीती, आता भाजप त्यांना पाकिस्तानी समर्थक ठरवू लागले", आदित्य ठाकरे यांचा हल्लाबोल

**नाशिक/वृत्तसंस्था**

शिवसेना (एकनाथ शिंदे) नेते डॉ. श्रीकांत शिंदे यांनी नाशिकमध्ये मागील आठवड्यात शिवसंवाद मेळावा घेत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधल्यानंतर आता शिवसेना (उध्दव ठाकरे) नेते आमदार आदित्य ठाकरे यांनीही नाशिकचा दौरा करुन कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना कोणकोणत्या समस्यांना हात घातला पाहिजे, प्रश्नांचा पाठपुरावा कसा केला पाहिजे, याविषयी मार्गदर्शन करतानाच पत्रकारांशी संवाद साधताना आदित्य ठाकरे यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या अपयशावर टीका केली.

कुंभमेळ्यास कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही. परंतु, कुंभमेळ्यातील कामांचे कंत्राट कोणाला देण्यात येत आहे, त्याचा नाशिकला काही फायदा आहे काय, याचा विचार करण्याची गरज आहे. नाशिकमध्ये सर्वत्र खोदकाम करुन ठेवल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. पावसाळा सुरु झाल्यानंतर ही कामे यशस्वी होतील का, याची खात्री सरकार देणार आहे काय, असा प्रश्न आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. जागतिक परिस्थिती वेगळी असली तरी या सरकारने मागील काही वर्षात



आर्थिक परिस्थितीवर असे काही करुन ठेवले आहे की, त्याचा परिणाम सर्वांना भोगावा लागत आहे. पैसे नाही दिले तरी कंत्राटदार खोदकाम सोडून देणार नाही, याची हमी सरकार देऊ शकणार आहे काय, असा प्रश्न उपस्थित करुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अनेक कंत्राटदारांना त्यांच्या कामाचे पैसे मिळाले नसल्याकडे लक्ष वेधले.

कुंभमेळ्यासाठी नाशिकमध्ये होणाऱ्या रिंगरोडकरिता होणाऱ्या भूसंपादनाविरोधात आवाज उठविणाऱ्या शेतकऱ्यांना अधिकाऱ्यांकडून मारहाण करण्यात आली. संजय राऊत यांनी नाशिक जिल्हाधिकाऱ्यांकडे हा मुद्दा मांडला होता. शेतकरी कधीही चांगल्या कामाला विरोध करीत नाही. परंतु, त्याच्या मागण्यांचाही विचार करणे आवश्यक असल्याचे ठाकरे यांनी सांगितले. शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी कोण होता शिवाजी ? हे पुस्तक वाचले असते तर शिवाजी महाराजांनी गद्दारांना काय शिक्षा दिली होती, याचा या गद्दारांना पळताना चारदा विचार करावा लागला असता. त्यांनी डोकं ठिकाणावर ठेवून देशात आणि राज्यात कोणते प्रश्न महत्वाचे आहेत, रोजगार किती आहेत, सरकारमुळे रुपयाची काय परिस्थिती झाली, या सरकारमुळे शहरांची काय अवस्था झाली, या प्रश्नांचा विचार करावयास हवा. असे प्रश्न अधिवेशनात मांडावयास हवेत. विधान परिषद निवडणुकीसंदर्भात उध्दव ठाकरे हेच पक्षाची अधिकृत भूमिका मांडतील.

# त्विशा शर्माच्या मृतदेहावर अखेर अंत्यसंस्कार, कुटुंबाने शोकाकुल वातावरणात दिला अखेरचा निरोप

**भोपाळ/वृत्तसंस्था**

मॉडेल आणि अभिनेत्री त्विशा शर्माच्या मृतदेहावर रविवारी संध्याकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. एम्स रुग्णालयाच्या शवागारात तिचा मृतदेह ठेवण्यात आला होता. त्यानंतर अखेर १२ दिवसांनी तिच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्विशा शर्माच्या मृतदेहाचं दुसऱ्यांदा शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर त्विशा शर्माच्या कुटुंबाने तिच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार केले. संध्याकाळी ५.१५ च्या सुमारास शोकाकुल वातावरणात तिला अखेरचा निरोप देण्यात आला. भोपाळच्या एम्स रुग्णालयाने त्विशाच्या मृतदेहाचं शवविच्छेदन केल्यानंतर तिचा मृतदेह तिच्या कुटुंबाला सोपवला. ज्यानंतर संध्याकाळी ५.१५ च्या सुमारा भदभदा स्मशान घाटावर तिच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तिच्या भावाने तिच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार केले.

त्विशाचे वडील नवनिधी शर्मा यांनी इंडियन एक्स्प्रेसला सांगितलं की त्विशाचा मृतदेह दिल्लीला घेऊन जाणं हे आमच्यासाठी कठीण होतं. तसंच ते व्यावहारिकही नाही. त्यामुळे आम्ही मध्य प्रदेश सरकारला सहकार्य मागितलं. ज्यानंतर तिच्या मृतदेहावर भोपाळमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. आता तिच्या अस्थी घेऊन आम्ही ऋषिकेशला जाऊ. ऋषिकेशमध्ये तिच्या अस्थींचं विसर्जन करण्यात येईल.



त्विशाच्या भावाने तिच्या मृतदेहाबाबत माहिती दिली. १२ मे रोजी त्विशाचा मृत्यू झाला. त्यानंतर १० दिवस तिचा मृतदेह शवागारात ठेवण्यात आला होता. आता तिचा मृतदेह ओळखणंही कठीण झालं होतं. मृतदेहात काही बदल झाले होते. कारण दहा दिवस तो मृतदेह शवागारात ठेवला होता. जन्म खुणांवरुन तिची ओळख पटवण्यात आली असंही हर्षित शर्माने सांगितलं.

त्विशा शर्मा नावाच्या महिलेचा मृतदेह भोपाळमध्ये असलेल्या तिच्या सासरी म्हणजेच नवरा समर्थ सिंगच्या घरी १२ मे २०२६ ला आढळून आला. समर्थ सिंग हा पेशाने एक वकील आहे. २०२४ मध्ये समर्थ आणि त्विशा यांची भेट एका डेटिंग ॲपद्वारे झाली होती. त्यानंतर २०२५ मध्ये या दोघांनी लग्न केलं. त्विशा शर्मा ही मूळची उत्तर प्रदेशातील नोएडाची आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार त्विशा ही मुळची नोएडाची होती. एका डेटिंग ॲपद्वारे तिची आणि समर्थ सिंगची ओळख झाली. त्यांच्यात आधी मैत्री झाली, मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं. ज्यानंतर २०२५ ला या दोघांनी लग्न केलं. लग्नानंतर अवघ्या सहा महिन्यांतच त्विशाचा मृतदेह तिच्या घरी आढळून आला.

त्विशाचे वडील म्हणाले की ज्या क्षणी कळलं की तिचा मृत्यू झाला आहे आम्ही त्याक्षणी घरातून बाहेर निघालो. आम्हाला फोन आला होता त्यावर इतकंच सांगण्यात आलं की त्विशा या जगात नाही. दिल्ली, अजमेर या ठिकाणाहून आम्ही आणि आमचे कुटुंबीय भोपाळला पोहचले. आम्ही तिथे पोहचलो आणि जे दृश्य पाहिलं ते पाहून आमचा थरकाप उडाला. कारण त्विशाच्या शरीरावर जखमा झाल्या होत्या. तसंच काहीही घडलं नाहीये असं दाखवण्याचा आणि घडलेली परिस्थिती लपवण्याचा तिच्या सासरच्या लोकांनी खूप प्रयत्न केला. आम्ही घडल्या प्रकाराची दाद मागण्यासाठी पोलीस स्टेशन, महिला आयोग, मानवी हक्क आयोग सगळ्यांकडे गेलो. त्विशाचा भाऊ म्हणाला की तिचा मृतदेह आम्ही पाहिला तेव्हा त्यावर असंख्य जखमा जाल्या होत्या. आम्ही पोलीस ठाण्यातही गेलो पण आमची तक्रार नोंदवून घेण्यासाठी रात्रीचे अडीच वाजले होते. शिवाय जी काही तक्रार नोंदवून घेतली ती देखील थातुरमातुरच होती असंही त्विशाच्या भावाने सांगितलं.

गिरीबाला सिंग म्हणाल्या होत्या, "गेल्या पाच महिन्यांत त्विशाचे आई-वडील तिला एकदाही भेटायला आले नाहीत. त्विशाच्या सौंदर्यामुळे ते पैसे कमवत होते आणि आता ते तिच्या अंत्यसंस्कारालाही नकार देत आहेत. माझा तपास यंत्रणांवर आणि सत्यावर पूर्ण विश्वास आहे." पालकांनीच त्विशाच्या करिअरवर नियंत्रण ठेवले आणि नंतर तिच्याशी संबंध तोडल्याचा आरोपही त्यांनी केला. त्या म्हणाल्या, त्विशाच्या पालकांनी तिला लहान वयातच ग्लॅमरच्या जगात ढकलले आणि नंतर तिला वाऱ्यावर सोडले. त्विशाने स्वतः कबूल केले होते की तिने गरोदरपणाच्या काळात मोठ्या प्रमाणात गांजाचे सेवन केले होते." या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबाचे मोठे नुकसान झाल्याचे सांगत त्या म्हणाल्या, "त्विशा एका 'मेंटल ट्रेनिंग प्रोग्राम'मधून (मानसिक उपचार) जात होती, आम्ही तिला पूर्ण पाठिंबा दिला. तिच्या जाण्याने आमच्या आयुष्यात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. परिस्थिती काहीही असली तरी ती आमच्या कुटुंबाचा भाग होती. ती मानसोपचार तज्ज्ञांकडे समुपदेशनासाठीही जात होती. तिला स्किझोफ्रेनिया (एक गंभीर मानसिक आजार) च्या रुग्णाला दिली जाणारी औषधे लिहून दिली होती. औषधांमुळे ती एखादा दिवस बरी राहायची, पण नंतर तिच्या प्रकृतीत पुन्हा बदल व्हायचा. आम्ही तिच्यात काही शारीरिक लक्षणे पाहिली होती, जसे की तिचे हात थरथरायचे, जे सहसा ड्रग्स सोडल्यानंतरच्या लक्षणांमध्ये घडते. तिने सर्व काही उद्ध्वस्त केले."

### पोलीस आयुक्त यांनी २१ मे रोजी काय सांगितलं?

त्विशाचा मृतदेह १२ मे रोजी तिच्या घरी होता, ज्यानंतर आम्ही या प्रकरणात सगळा तपास केला. आम्ही त्विशाच्या मृतदेहाचं शवविच्छेदनही केलं. मात्र यात कुठेही आढळून आलं नाही की त्विशाची हत्या झाली आहे. तसंच आम्हाला जे पुरावे सापडले आहेत त्यावरुनही हे स्पष्ट होतं आहे की ही आत्महत्या आहे. त्विशाची हत्या झालेली नाही. तिने आत्महत्या केली आहे असं पोलीस आयुक्तांनी म्हटलं आहे.

## वालोपे येथे अपघात; चिमुकलीचा मृत्यू, ग्रामस्थांचा मुंबई-गोवा महामार्गावर रास्ता रोको

**रत्नागिरी/वृत्तसंस्था**

चिपळूण तालुक्यातील वालोपे येथे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर रविवारी (२४ मे) रात्री झालेल्या भीषण अपघातात चार वर्षीय चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर तिचे आई-वडील गंभीर जखमी झाले आहेत. या दुर्घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी महामार्गावर रास्ता रोको आंदोलन छेडल्याने दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, होमगार्ड कर्मचारी कुणाल आग्रे हे पत्नी आणि चार वर्षीय मुलीसह रविवारी रात्री प्रवास करत होते. रात्री सुमारे १० ते १०.३० वाजण्याच्या सुमारास वालोपे परिसरातून जात असताना भरधाव वेगाने येणाऱ्या टँकरने त्यांच्या वाहनाला मागून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की वाहनाचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. वाहनातील चार वर्षीय चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला, तर कुणाल आग्रे आणि त्यांच्या पत्नीला गंभीर दुखापत झाली.स्थानिकांच्या मदतीने जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच वालोपे आणि परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. मुंबई-गोवा महामार्गावर वारंवार होणारे अपघात, अवजड वाहनांचा बेदरकार वेग आणि अपुऱ्या सुरक्षाव्यवस्थेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

यावेळी संतप्त ग्रामस्थांनी काही वेळातच महामार्गावर रास्ता रोको आंदोलन सुरू केले. त्यामुळे दोन्ही बाजूंना पाच ते सहा किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. अनेक प्रवासी, खासगी वाहने तसेच मालवाहतूक करणारी वाहने महामार्गावर अडकून पडली होती. दोन तासांहून अधिक काळ वाहतूक ठप्प झाल्याने प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

घटनेची माहिती मिळताच चिपळूण पोलीस, महामार्ग पोलिस तसेच प्रशासनाचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी ग्रामस्थांशी चर्चा करून आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न सुरू ठेवले. दरम्यान, संबंधित टँकर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून या प्रकरणाचा पुढील तपास चिपळूण पोलिसांकडून केला जात आहे. या भीषण अपघातानंतर मुंबई-गोवा महामार्गावरील सुरक्षाविषयक उपाययोजना अधिक कडक करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## स्कॉर्पिओ दरीत कोसळून आठ जणांचा मृत्यू

**अलिबाग :** पोलादपूर- महाबळेश्वर मार्गावरील आंबेनळी घाटात सोमवारी पहाटे भीषण अपघात झाला. कोकणातून साताऱ्याकडे जात असलेली स्कॉर्पिओ गाडी शेकडो फूट खोल दरीत कोसळल्याने आठ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. पहाटे सुमारे पावणेतीन वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली.

अपघाताची माहिती मिळताच महाबळेश्वर रेस्क्यू टीम, भाटिया रेस्क्यू ग्रुप, प्रतापगड रेस्क्यू टीम, सिस्केप, पोलिस प्रशासन तसेच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. घाटातील अतिशय अवघड मार्ग, खोल दरी आणि मध्यरात्रीची वेळ यामुळे बचाव कार्यात मोठ्या अडचणी येत आहेत. तरीही विविध यंत्रणा समन्वयाने कार्यरत असून ऑपरेशन अंतिम टप्प्यात पोहोचत आहे. अपघातग्रस्त स्कॉर्पिओ गाडीचा क्रमांक एमएच ११ डीएन २३४० असा असून गाडीत प्रवास करणारे सर्व जण सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील आसगाव येथील रहिवासी असल्याची माहिती मिळाली आहे. मृतांमध्ये महेश अनिल पवार (वय २५), आदित्य अशोक साळुंखे (वय २१), रितेश राजेंद्र लोखंडे (वय २५), सुहास जितेंद्र लोखंडे (वय २०), अंश समीर चव्हाण (वय १८), उत्कर्ष आनंद शिंगटे (वय २१), अनिल अभिमन्यू शिंगटे (वय २५), नितीन किसन नायकोंडे (वय ३५) या व्यक्तींचा समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे दरम्यान, आंबेनळी घाटात यापूर्वीही मोठ्या दुर्घटना घडल्या असून काही वर्षांपूर्वी बस दरीत कोसळून अनेकांचा मृत्यू झाला होता.

## नगरसेवकाच्या टोळीचा गोदापात्रात धुमाकूळ; नेम चुकल्याने दोन शेतकरी बालंबाल बचावले

**छत्रपती संभाजीनगर/वृत्तसंस्था**

गंगापूर तालुक्यातील बाभूळगंगा परिसरातील गोदावरी नदी पात्रात शनिवारी मध्यरात्री वाळू तस्करांचा धुमाकूळ पाहायला मिळाला. विद्युत पंप सुरू करण्यासाठी शेतकऱ्यांवर वाळु तस्करांनी गोळीबार केला. या घटनेत दोघे बालंबाल बचावले असून, या प्रकरणी वीरगाव पोलीस ठाण्यात ९ जणांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीमध्ये श्रीरामपूर नगर पालिकेचा एका अपक्ष नगरसेवकाचा समावेश आहे. बाभूळगाव शिवारातील गोदापात्रात अवैध वाळू उपसा सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर काही शेतकरी घटनास्थळी गेले असता तस्करांनी त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यास सुरूवात केली. बाभुळगाव गंगा येथील जालींदर सोपान कुंजीर यांची गोदावरी नदी पात्रात गट नंबर ५१ मध्ये विहीर आहे. या विहीरीवरील विद्युत पंप सुरू करण्यासाठी जालींदर कुंजीर हे गेले होते. त्याचवेळी गोदावरी नदी पात्रात वाळु तस्करी करीत असलेले माफिया जालींदर यांच्या अंगावर धावत आले. त्यांनी जालींदर यांना पकडून ठेवत शिवीगाळ करून मारहाण केली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे जालींदर यांनी त्यांचे चुलत भाऊ विजय सर्जेराव कुंजीर यांना ही घटना सांगितली. विजय व अन्य परीसरातील शेतकरी गोदावरी नदी पात्रात आले. परंतु वाळु तस्करांचा रौद्र अवतार पाहून सर्व जण अंधारात पळाले. वाळु तस्करांनी पाठलाग करत विजय व जालींदर यांना काठीने बेदम मारहाण केली.

तुम्ही पोलिसांना आमची माहीती देता काय ? असे म्हणत तुम्हाला नीलेश शेंडगे सारखे संपवतो, असे आरोपी म्हणत होता. शंकरला सांगू का असे तो म्हणत असल्याने शंकर कोण असा प्रश्न निर्माण झाला आहे. कुंजीर बंधु जीव वाचवत अंधारात निसटून जात असताना वाळु तस्करांनी गोळीबार केला. परंतु त्यांचा अंधारात नेम चुकल्याने कुंजीर बंधू बालंबाल बचावले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे वाळू तस्करांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. पीडित शेतकरी जालींदर सोपान कुंजीर यांनी दिलेल्या तक्रारीवरून जीवघेणा हल्ला, बेकायदेशीर जमाव जमवणे, धमकी देणे आणि शस्त्रास्त्र कायद्यानुसार ९ आरोपींविरुद्ध विरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीमध्ये अर्जुन खुशाल दाभाडे, उद्देश अशोक मंडलिक, महेश गायकवाड, विकास उर्फ विकी बबन ढमके, राहुल चव्हाण, विजय उर्फ भोगर भास्कर हटांगळे, मंगेश साहेबराव साळवे, विजय पवार, राहुल थोरात या ९ जणांचा समावेश आहे. यातील मुख्य आरोपी अर्जून दाभाडे हा श्रीरामपूर नगर परिषदेचा अपक्ष नगरसेवक आहे. त्याने राज्यातील एका प्रमुख पक्षाला समर्थन दिले आहे.

# सलग सहा पराभव आणि पंजाबचं पॅकअप; जेतेपदाचे दावेदार 19व्या हंगामातही रित्याहाती का परतले?

■ मुंबई, वृत्तसंस्था :

दमदार सांघिक प्रदर्शनासह यंदाच्या आयपीएल स्पर्धेत पंजाब किंग्ज संघाने सलग सात लढती जिंकल्या. प्लेऑफ प्रवेशासाठी त्यांना उर्वरित सात लढतीत केवळ दोन विजय मिळवणं आवश्यक होतं. पंजाबसाठी प्लेऑफ प्रवेश औपचारिकता मानला जात होता. ऐन भरात असतानाच पंजाबची गाडी रुळावरून घसरली. एक दोन नव्हे तर सलग सहा लढतीत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात खेळणारा पंजाबचा संघ जेतेपदाचा प्रबळ दावेदार होता. मात्र सहा पराभवांनी पंजाबची लयच हरपली. लखनौला नमवत पंजाबने प्लेऑफ्सच्या आशा जिवंत राखल्या. मुंबई इंडियन्सने राजस्थानला नमवलं असतं तर पंजाबचा प्लेऑफ प्रवेश पक्का झाला असता पण नियतीच्या मनात वेगळंच काही होतं. रविवारी राजस्थानने दिमाखदार कामगिरीसह मुंबईला हरवत प्लेऑफमध्ये प्रवेश केला. राजस्थानच्या विजयासह पंजाबचं आव्हान संपुष्टात आलं. भरधाव निघालेला विजयरथ गाळात रुतावा अशी पंजाबची गत झाली. सलग १९ हंगाम खेळूनही पंजाबचा संघ जेतेपदाविनाच परतणार आहे. पंजाबचं असं का झालं? तिन्ही आघाड्यांवर चांगली कामगिरी होत असताना घरी जाण्याची वेळ का ओढवली याचा घेतलेला आढावा.



धरमशाला इथे पंजाब किंग्स आणि मुंबई इंडियन्स सामन्यापूर्वी अर्शदीप सिंगने इंस्टाग्रामवर शेअर केलेल्या एका व्हिडिओत तिलक वर्माला 'ओये अंधेरे' म्हटल्याने वाद पेटला. वर्णभेदी टीकेनंतर नेटकऱ्यांनी अर्शदीपवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. अर्शदीप सिंग व्लॉगिंग करतो. सोशल मीडियावर तो अतिशय सक्रिय असतो. हलक्याफुलक्या पद्धतीचं कंटेट तो करत असतो. टी२० प्रकारात भरवशाचा गोलंदाज असलेल्या अर्शदीपला यंदाच्या हंगामात लौकिकाला साजेशी कामगिरी करता आली नाही. कामगिरीत घसरण होत असताना दुसरीकडे तिलकला उद्देशून आक्षेपार्ह उद्गारांमुळे त्याच्यावर प्रचंड टीका झाली. बीसीसीआयने हंगामादरम्यान जारी केलेल्या नव्या नियमावलीनुसार खेळाडूंनी युट्यूब चॅनल, व्लॉग, सोशल मीडिया यापेक्षा खेळावर लक्ष केंद्रित करावं. एकप्रकारे अर्शदीपला ही चपराक होती. पंजाब किंग्ज संघाच्या सोशल मीडिया हँडल्सने कंटेट करताना थोडं भान राखायला हवं होतं. कोलकाताविरुद्धची लढत रद्द झाल्यानंतर मन मोठं म्हणून गुण दिला अशा आशयाचा व्हीडिओ शेअर केला. त्यांना तो व्हीडिओ डिलिट करावा लागला. ४९ वर ऑलआऊट होण्यावरून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला डिवचलं. संघ जिंकत असताना विनाकारण फाजील पद्धतीचं कंटेट तयार करून त्यांनी प्रतिमा खराब केली.

कॅचेस विन मॅचेस अशी क्रिकेटमधली जुनी म्हण आहे. पंजाबला या उक्तीचा चांगलाच प्रत्यय घडला. झेल सोडण्याबाबत पंजाब किंग्ज संघाने कहर केला. उडालेल्या ५६ झेलांपैकी १६ झेल त्यांना टिपता आले नाहीत. फलंदाजांचं वर्चस्व राहिलेल्या या स्पर्धेत झेल सुटणं हे जणू पातकच आहे. शशांक सिंह याने सर्वाधिक म्हणजे ५ झेल सोडले. अनुभवी फिरकी गोलंदाज युझवेंद्र चहलने सातत्याने सापळे रचून झेल उडेल अशी परिस्थिती निर्माण केली. मात्र पंजाबच्या क्षेत्ररक्षकांनी बेसिक गोष्टीतच कच्चं असल्याचं सिद्ध केलं. कर्णधार श्रेयस अय्यरला शशांकला क्षेत्ररक्षणात लपवण्याची वेळ आली. शशांकचा वाण बाकी खेळाडूंनाही लागला. यामुळेच हंगामात पंजाबची कॅचिंग एफिशियन्सी ७१.४३ एवढी राहिली. झेलच्या बरोबरीने पंजाबने स्टंपिंगच्या काही संधीही वाया दवडल्या. हेनरिच क्लासन आणि इशान किशनसारख्या जबरदस्त फॉर्मात असणाऱ्या खेळाडूंचे झेल सोडणं पंजाबला चांगलंच महागात पडलं. पंजाबच्या विदेशी खेळाडूंनाही झेल सोडण्याची लागण झाली. पंजाबचे प्रशिक्षक रिकी पॉन्टिंग हे जगातल्या अव्वल क्षेत्ररक्षकांपैकी एक मानले जातात. त्यांच्या संघानेच एवढे झेल सोडणं अगम्य योगायोग ठरला. यंदाच्या हंगामात चहलच्या गोलंदाजीवर झेल सुटले हे खरं पण त्याच्या गोलंदाजीतली धार कमी झाल्याचं स्पष्टपणे जाणवलं. १४ लढतीत चहलने १२ विकेट्स पटकावल्या. आयपीएल स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स पटकावणाऱ्यांच्या यादीत चहल अव्वल स्थानी आहे. अगदी आतापर्यंत चहलच्या गोलंदाजीवर धावा काढणं फलंदाजांना जड जात असे. मात्र यंदाच्या हंगामात चहलच्या गोलंदाजीवर सहजपणे धावा लुटल्या गेल्या. पंजाबने फिरकीवर लक्ष दिलं नसल्याचंही आकडेवारी सांगते. डावखुरा फिरकीपटू हरप्रीत ब्रार यंदाच्या हंगामात केवळ दोनच सामने खेळला. दुसऱ्या सामन्यात त्याने विकेट्स पटकावत आपली उपयुक्तता सिद्ध केली. पंजाबच्या फिरकीपटूंनी फक्त ५९ षटकं टाकली. यावरूनच फिरकी हा विषय त्यांनी ऑप्शनला टाकल्यासारखं जाणवलं. फिरकी असं नव्हे एकूणच गोलंदाजांनी पंजाबला गाशा गुंडाळायला लावला असं म्हटलं तर वावगं ठरू नये. पंजाबच्या गोलंदाजांनी ९वेळा २००पेक्षा जास्त धावा दिल्या. एका हंगामात एवढ्या धावा लूटू देण्याचा हा विक्रम आहे. अर्शदीप सिंग पंजाबच्या माऱ्याचा प्रमुख आहे पण यंदा तो पूर्णपणे भरकटलेला वाटला. दक्षिण आफ्रिकेच्या मार्को यान्सनवर पंजाबने विश्वास ठेवला पण ना त्याला धावा रोखता आल्या ना विकेट्स पटकावता आल्या.

## रोहित १०० % फिट, हे BCCIला माहितच नाही? दिग्गज खेळाडूचा मोठा खुलासा




■ चेपॉक/वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ स्पर्धा झाल्यानंतर भारतीय संघ अफगाणिस्तानविरुद्ध वनडे आणि कसोटी सामन्याची मालिका खेळणार आहे. या दोन्ही मालिकांसाठी बीसीसीआयकडून भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. तर वनडे क्रिकेटमध्ये तो अजूनही भारतीय संघाचा भाग आहे. अफगाणिस्तानविरुद्ध होणाऱ्या मालिकेसाठी त्याला भारतीय संघात स्थान देण्यात आलं आहे. पण त्याच्या नावापुढे फुली आहे, याचा अर्थ असा की, रोहित खेळणार की नाही हे त्याच्या फिटनेसवर अवलंबून असणार आहे. बीसीसीआयच्या मते, रोहित शर्मा अजूनही पूर्णपणे फिट होऊ शकलेला नाही. दरम्यान मुंबई इंडियन्सचा मुख्य प्रशिक्षक महेला जयवर्धनेने रोहितच्या फिटनेसबाबत मोठी अपडेट दिली आहे.


रोहित शर्माने आयपीएल २०२६ स्पर्धेत दमदार सुरुवात केली होती. पण त्यानंतर त्याला ३ आठवडे दुखापतीमुळे मैदानाबाहेर राहावं लागलं होतं. त्यामुळे त्याला काही सामने खेळता आले नव्हते. त्यामुळे बीसीसीआयला अजूनही वाटतंय की, रोहित शर्मा पूर्णपणे फिट झालेला नाही. पण महेला जयवर्धनेने दिलेल्या माहितीनुसार, रोहित शर्मा १०० टक्के फिट आहे. पत्रकार परिषदेत बोलताना महेला जयवर्धने म्हणाले, "आमच्या फिटनेस टीमने दिलेल्या माहितीनुसार, रोहित शर्मा १०० टक्के फिट आहे. हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीतून सावरल्यानंतर आम्ही जरा काळजी घेत आहोत. टीम कॉम्बिनेशनमुळे त्याला आम्ही इम्पॅक्ट प्लेअर म्हणून खेळवतोय. त्याच्या फिटनेसबाबत कुठलीही शंका नाही." यावरून हे तर स्पष्ट झालं आहे की, रोहित शर्मा पूर्णपणे फिट आहे. मग बीसीसीआयने त्याच्या नावासमोर स्टार का लावला? बीसीसीआयला रोहितच्या फिटनेसबाबत कुठलीही अपडेट मिळालेली नाही का? असे अनेक प्रश्न आता उपस्थित केले जाऊ लागले आहेत. अफगाणिस्तानविरुद्ध होणाऱ्या मालिकेत रोहित खेळणार का? की फिटनेसमुळे बाहेर बसणार? हे पाहणं आता महत्वाचं ठरणार आहे.

## आयपीएल सामन्यांतील 'सलाम मुंबई'वर आक्षेप

■ मुंबई/वृत्तसंस्था

आयपीएलच्या मुंबईतील सामन्यांदरम्यान झळकणाऱ्या 'सलाम मुंबई' या घोषणेतील 'सलाम' या शब्दावर आक्षेप घेत त्याऐवजी 'नमस्कार' किंवा 'नमस्ते मुंबई' या शब्दांचा वापर करण्याची मागणी भारतीय जनता पक्षांच्या युवा मोर्चाने केली आहे.

'सलाम' या शब्दाला कवीवर्य मंगेश पाडगावकर यांनी आपल्या 'सलाम' या अजरामर कवितेतून मराठी साहित्य, सांस्कृतिक विश्वात वेगळेच वलय मिळवून दिले आहे. अत्यंत बोचऱ्या आणि तीक्ष्ण शब्दात 'सलाम' ही कविता राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीवर विडंबनात्मक भाष्य करते. हा शब्द मूळ अरबी असला तरी मराठीत आदरयुक्त वंदन, नमस्कार किंवा अभिवादन करण्यासाठी सहज वापरला जातो. उदाहरणार्थ सलाम ठोकणे. या शब्दाच्या वापरावर भाजयुमोचा आक्षेप आहे. 'मुंबईची संस्कृती व ओळख 'सलाम मुंबई' नाही. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेशी सुसंगत 'नमस्कार मुंबई' अथवा 'नमस्ते मुंबई' अशी असली पाहिजे. त्यामुळे 'सलाम मुंबई' हा शब्दप्रयोग तात्काळ बंद करून त्याऐवजी 'नमस्कार' किंवा 'नमस्ते मुंबई' या शब्दांचा वापर करण्यात यावा, अशी मागणी भाजयुमोचे मुंबई अध्यक्ष दिपक सिंह यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनचे




अध्यक्ष अजिंक्य नाईक यांना पत्र लिहून केली आहे. मुंबई : आयपीएलच्या मुंबईतील सामन्यांदरम्यान झळकणाऱ्या 'सलाम मुंबई' या घोषणेतील 'सलाम' या शब्दावर आक्षेप घेत त्याऐवजी 'नमस्कार' किंवा 'नमस्ते मुंबई' या शब्दांचा वापर करण्याची मागणी भारतीय जनता पक्षांच्या युवा मोर्चाने केली आहे. 'सलाम' या शब्दाला कवीवर्य मंगेश पाडगावकर यांनी आपल्या 'सलाम' या अजरामर कवितेतून मराठी साहित्य, सांस्कृतिक विश्वात वेगळेच वलय मिळवून दिले आहे. अत्यंत बोचऱ्या आणि तीक्ष्ण शब्दात 'सलाम' ही कविता राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीवर विडंबनात्मक भाष्य करते.

## आकिब नबीला डावलल्याने माजी खेळाडू आगरकरांवर संतापले

■ मुंबई/वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ नंतर अफगाणिस्तानविरूद्ध होणाऱ्या वनडे आणि कसोटी मालिकेसाठी भारतीय संघाची निवड करण्यात आली आहे. यामध्ये गुरनूर ब्रारसह ३ नव्या खेळाडूंना संधी दिली आहे. पण यामध्ये रणजी ट्रॉफीत ६० विकेट्स घेत जम्मू काश्मीरला पहिलं रणजी जेतेपद पटकावून देण्यात मोठी भूमिका बजावणाऱ्या आकिब नबीची मात्र निवड करण्यात आली नाही. हे पाहून निवड समितीचे प्रमुख अजित आगरकर व निवड समितीवर टीका केली जात आहे. आता भारताचे माजी खेळाडू दिलीप वेंगसरकरदेखील संतापले आहेत.

माजी भारतीय कर्णधार दिलीप वेंगसरकर देखील आकिब नबीला संघात न घेतल्याने संतापले आहेत. अफगाणिस्तानविरुद्ध होणाऱ्या एकमेव कसोटी सामन्यासाठी संघ निवडताना जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबीकडे दुर्लक्ष केल्याबद्दल अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीवर जोरदार टीका केली आहे. आकिब नबीने २०२५-२६ रणजी ट्रॉफी हंगामात अफलातून कामगिरी करत १० सामन्यांत १२.५६ च्या जबरदस्त सरासरीने तब्बल ६० विकेट्स घेतल्या आणि स्पर्धेतील सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज ठरला. जम्मू-काश्मीरला पहिल्यांदाच रणजी ट्रॉफी विजेतेपद मिळवून देण्यात त्याची मोठी भूमिका होती. या शानदार कामगिरीसाठी त्याला 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' पुरस्काराने गौरवण्यात आलं. २९ वर्षीय या गोलंदाजाने संपूर्ण हंगामात मॅचविनिंग कामगिरी केल्या. हुबळी येथे कर्नाटकविरुद्ध झालेल्या अंतिम सामन्याच्या पहिल्या डावात त्याने ५४ धावांत ५ विकेट्स घेतल्या. कल्याणी येथे बंगालविरुद्धच्या उपांत्य फेरीत त्याने सामन्यात एकूण ९ विकेट्स घेत १२३ धावा दिल्या, तर इंदूरमध्ये मध्य प्रदेशविरुद्धच्या उपांत्यपूर्व फेरीत तब्बल १२ विकेट्स घेत ११० धावा दिल्या. त्याच्या नावावर या हंगामात सात वेळा पाच विकेट्स आणि दोन वेळा चार विकेट्स घेण्याची कामगिरी नोंदवली गेली. अशी उत्कृष्ट कामगिरी असतानाही त्याची निवड न झाल्याने अनेक माजी खेळाडूंनी भारतीय संघाच्या निवड समितीवर टीका केली आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ‘देऊळ बंद 2’ सिनेमाने 3 दिवसांत केली ‘इतक्या’ कोटींची कमाई; प्रवीण तरडे यांनी शेअर केली पोस्ट

देऊळ बंद हा सिनेमा प्रचंड गाजला. २०१५ मध्ये हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. सिनेमातील प्रत्येक पात्राचे, गोष्टीचे कौतुक झाले होते. नुकताच देऊळ बंद २ हा सिनेमा प्रदर्शित झाला आहे.

सिनेमा प्रदर्शित होण्याआधीपासूनच देऊळ बंद २ ची सर्वत्र चर्चा सुरू होती. चित्रपटाच्या टीझर व ट्रेलरला प्रेक्षकांचे मोठ्या प्रमाणात प्रेम मिळाले. २१ मे २०२६ देऊळ बंद हा सिनेमा प्रदर्शित झाला. त्यानंतर सिनेमाला प्रेक्षकांचे मोठ्या प्रमाणात प्रेम मिळाल्याचे पाहायला मिळत आहे. प्रवीण तरडे यांनी हा सिनेमा दिग्दर्शित केला आहे. नुकतीच त्यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये सिनेमाने कोणत्या दिवशी किती कमाई केली, याबद्दल लिहिले आहे. तर तीन दिवसांत एकूण किती कमाई केली हेही दिसत आहे. पहिल्या दिवशी म्हणजेच गुरूवारी या सिनेमाने, ३.०५ कोटींची कमाई केली. दुसऱ्या दिवशी म्हणजेच शुक्रवारी ३.११ कोटींची कमाई केली आहे आणि शनिवारी या सिनेमाने ५.२१ कोटींची कमाई केली आहे. तीन दिवसांत या सिनेमाने ११.३७ कोटींची कमाई केली आहे.






प्रवीण तरडे यांच्या पोस्टवर अनेकांनी कमेंट्स केल्या आहेत. एकाने लिहिले, “सर अभिनंदन. खूप छान सिनेमा, छान लेखन, मांडणी आणि सर्वांचा अप्रतिम अभिनय आहे. वास्तववादी विषयांची सुंदर हाताळणी, पुढील वाटचालीस तुम्हाला खूप खूप शुभेच्छा. ‘देऊळ बंद ३’ची वाट पाहतोय”, दुसऱ्याने लिहिले, “देऊळ बंद २ टीमचे खूप खूप अभिनंदन”, आणखी एकाने लिहिले, “हार्दिक अभिनंदन”, एकाने लिहिले,”अभिनंदन सर आपणास पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा”, एकाने लिहिले, “आज च कलेक्शन बघा सर. रविवार पूर्ण हाऊस फुल असणार आम्ही स्वतः १५ जण चित्रपट पाहायला जात आहोत”, एकाने लिहिले, “फक्त आता देऊळ बंद ३ लवकरात लवकर प्रदर्शित करा”, अशा अनेक कमेंट्स पाहायला मिळत आहेत. सर्वजण देऊळ बंद २ च्या टीमवर कौतुकाचा वर्षाव करत आहेत. आता आगामी काळात हा सिनेमा किती कमाई करणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

प्रवीण तरडे दिग्दर्शित या सिनेमात शेतकऱ्याची गोष्ट पाहायला मिळते. अनेक लोकप्रिय कलाकार या सिनेमात महत्वाच्या भूमिकेत आहेत. महेश मांजरेकर, प्रसाद ओक, मंगेश देसाई, स्नेहल तरडे, ओम भुतकर हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. तसेच, देऊळ बंदमध्ये दिसलेला राघव शास्त्री म्हणजेच गशमीर महाजनी देऊळ बंद २ मध्येदेखील दिसला आहे. मोहन जोशी यांनी या सिनेमात स्वामी समर्थ ही भूमिका साकारली आहे. त्यांच्या भूमिकेला प्रेक्षकांचे प्रेम मिळत आहे. दरम्यान, आता आगामी काळात देऊळ बंद २ हा सिनेमा किती कोटींची कमाई करणार हे जाणून घेण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत.

# ‘चित्रपटात काम करायचं असेल तर कॉम्प्रोमाईज करावं लागेल’; मेघा घाडगेंनी सांगितला अनुभव

मराठी चित्रपटसृष्टीत काम करायचं होतं त्यावेळी मला कॉम्प्रोमाईज करावं लागेल हे सांगितलं गेलं. शिवाय मी एकटी होते, त्यामुळे मी जेव्हा या गोष्टींना नकार दिला तेव्हा वाट्टेल ते बोलून माझी बदनामी केली गेली. माझ्या मैत्रिणींनी मला वाईट अनुभव दिले आहेत. अशा सगळ्या गोष्टींबाबत मेघा घाडगे यांनी सांगितल्या आहेत. तसंच दारुच्या नशेत एका कलाकाराने कसे केस पकडून मला शिव्या दिल्या होत्या हेदेखील सांगितलं.



चित्रपटातल्या लावण्या जवळपास बंद झाल्या होत्या. पण पछाडलेला चित्रपट, नटरंग आला त्यामुळे लावणी पुन्हा चित्रपटांमध्ये आली. मला ते खूप छान वाटत होतं. आम्ही रंगमंचावर जी लावणी करतो ती वेगळी. चित्रपटात लिबर्टी घेतली जाते. पण इतकीही लिबर्टी घेऊ नका की त्यातली लावणी मरेल. महाराष्ट्राची ही लोककला आहे तिला खालच्या दर्जाला का घेऊन जातात? तेव्हा मग मराठीसाठी बोलणारे कुठे असतात? मी बदलांबाबत काही आक्षेप घेत नाही. पण इतकंही बदलू नका की बघायला लाज वाटेल. मी वसंतरावमध्ये शकुबाईंनी किती सुंदर लावणी केली आहे. तासनं तास ती लावणी बघावीशी वाटते. पण त्या लावणी गीतांना प्रसिद्धी मिळाली नाही अशी खंत अभिनेत्री आणि लावणी नृत्यांगना मेघा घाडगे यांनी स्पष्ट केलं. मला सोनाली कुलकर्णी आवडते, तिला लावणीचा सेन्स आहे. लावणीबाबत तिला कळतं. संस्कृती बालगुडे आहे तिलाही डान्स माहीत आहे. तिचा बाज जरी नसला तरीही या अभिनेत्री लावणीला न्याय देतात. पछाडलेला चित्रपटासाठी माझं खूप कौतुक झालं होतं. मला आजही ते स्मरणात आहे. पुण्यातल्या सगळ्या मैत्रिणी, संगिताताई, सीमा कोटे अनेकींचे मला फोन आले होते. घरातून केलं जाणारं कौतुक वेगळं पण आपल्याला ओळखणारी माणसं कौतुक करतात तेव्हा मजा वाटते असं मेघा घाडगे यांनी म्हटलं आहे.

चित्रपटसृष्टीत आले त्यावेळी अशा गोष्टी केल्या गेल्या की ही एकटी आहे. हिच्याबरोबर कुणी मॅनेजर नाही, माझ्या वतीने कुणी बोलणार नाही. कॉम्प्रोमाइज करावं लागतं, तसं केलं नाही तर पुढे जाता येणार नाही. पण मी त्यांना तिथेच थांबवलं होतं. पण ते बाहेर जाताना चुकीच्या पद्धतीने जातं. त्यामुळे ते लोक माझी बदनामी करु लागले. माझ्या चॉईसने काही केलं तर गोष्ट वेगळी आहे. पण मला ते काही करायचंच नव्हतं. ही याच्याबरोबर झोपली आहे, आपल्याबरोबर का येत नाही इथपर्यंत लोकांनी बदनामी केली. माझा काहीच संबंध कुणाशी नव्हता. मी कुणाला ओळखतही नव्हते.तरीही हे बोललं गेलं. एका पार्टीत माझे केस वगैरे पकडले गेले होते. तू कसली आहेस, स्वतःला शहाणी समजतेस वगैरे मला हे बोललं गेलं होतं. मी पहिल्यांदाच गेले होते पार्टीला. तिथे जे घडलं तो अनुभव भयंकर होती. त्यावेळी त्या माणसाने सरळ माझे केस पकडले. मला काय करावं सुचलं नाही. मी तिथून निघून गेले, माझी एक मैत्रीण होती तिने त्या प्यायलेल्या नटाला थांबवलं.” असा अनुभव मेघा घाडगेंनी या मुलाखतीत सांगितला.

# राम चरणची जसप्रीत बुमराहबाबत ‘ही’ मोठी चूक; सोशल मीडियावर ट्रोल होताच मागितली माफी

राम चरण हा सोशल मीडियावर जोरदार चर्चेमध्ये आला आहे. मात्र, यावेळी तो कोणत्याही चित्रपटामुळे नव्हे, तर एका वक्तव्यात झालेल्या चुकीमुळे ट्रोल होत आहे. एका म्युझिक इव्हेंटदरम्यान झालेल्या रॅपिड फायर राउंडमध्ये राम चरणकडून अनवधानाने मोठी चूक झाली. भारतीय क्रिकेटर जसप्रीत बुमराहला त्याने फुटबॉलमध्ये दिलेल्या योगदानासाठी धन्यवाद मानले. या वक्तव्यानंतर सोशल मीडियावर नेटकऱ्यांनी आश्चर्य व्यक्त करत त्याला ट्रोल करण्यास सुरुवात केली. अखेर ही चूक लक्षात आल्यानंतर राम चरणने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत चाहत्यांची जाहीर माफी मागितली आहे.



भोपाळमध्ये पेड्डी (Peddi) चित्रपटाचा भव्य संगीत प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी ए. आर. रेहमानसह चित्रपटातील इतर कलाकार उपस्थित होते. म्युझिक लॉन्च कार्यक्रमामध्ये अभिनेता राम चरणने उपस्थितांशी संवाद साधला. तसेच यावेळी त्याला भारतीय खेळाडूंबाबत प्रश्न विचारण्यात आले. रॅपिड फायर पद्धतीने या प्रश्नोत्तरामध्ये राम चरणने इतर खेळाडूंबाबत चपखल उत्तरे दिली. मात्र, बॉलर जसप्रीत बुमराहबद्दल प्रश्न विचारल्यानंतर राम चरण गडबला आणि त्याने जसप्रीतला फुटबॉलर म्हणून संबोधले. राम चरणला भारतीय खेळाडूंबाबत प्रश्न विचारण्यात आला. सचिन तेंडुलकरबद्दल विचारल्यावर ‘लॉन्ग लेजेंडर’ म्हटले. तसेच एम. एस. धोनीचे वर्णन ‘शांत आणि संयमी’ आणि विराट कोहलीला ‘फायर’ म्हटले. याचबरोबर रोहित शर्माचा उल्लेख ‘सर्वांचा लाडका’ असा केला. मात्र, यानंतर राम चरणला जसप्रीत बुमराहबाबत प्रश्न विचारला असता त्याने अनावधानाने त्याला फुटबॉलर म्हटले.

# ऐश्वर्या रायच्या ‘त्या’ कृतीने जिंकली चाहत्यांची मनं, व्हिडिओ व्हायरल

कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये बॉलीवूड अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन सहभागी झाली आहे. कान्स फेस्टिव्हलच्या पहिल्या दिवसापासून सर्वत्र ऐश्वर्याचीच चर्चा होती. ती रेड कार्पेटवर कधी येणार याची चाहते आतुरतेने वाट पाहत होते. दरम्यान, कान्स फेस्टिव्हलच्या शेवटच्या दिवशी ऐश्वर्या सहभागी झाली आहे. यावेळी ऐश्वर्याने तीन वेगवेगळे लूक केले असून तिच्या प्रत्येक लूकला चाहत्यांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे. तिची एलिगंट स्टाईल, आत्मविश्वास आणि ग्लॅमरस व्यक्तिमत्त्वाची सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगली आहे. दरम्यान, कान्समध्येही ऐश्वर्याच्या चाहत्यांची क्रेझ पाहायला मिळाली. हॉटेलबाहेर तसेच रेड कार्पेट परिसरात शेकडो चाहते तिची एक झलक पाहण्यासाठी आणि तिच्यासोबत फोटो काढण्यासाठी गर्दी करताना दिसून आले. यावेळी ऐश्वर्याने चाहत्यांना दिलेली खास वागणूक आणि प्रेम चर्चेचा विषय ठरले आहे.



ऐश्वर्या राय बच्चन हिने कान्स फेस्टिव्हलच्या समारोपावेळी पांढऱ्या रंगाचा डिझायनर फॉर्मल कॉर्सेट परिधान केला होता. यावर सिल्व्हर डिझाइन असलेले फर आणि फेदर केप स्टाईल केले होते. डीपनेक असलेल्या या ड्रेसमध्ये ऐश्वर्याचे सौंदर्य अधिक खुलले होते. मोकळ्या केसांसह आणि ग्लॅमरस मेकअपने ऐश्वर्या राय बच्चन रेड कार्पेटवर प्रभावी आणि आकर्षक दिसत होती.

रेड कार्पेटवरील उपस्थितीनंतर ऐश्वर्याने हॉटेलबाहेर तिची वाट पाहणाऱ्या चाहत्यांसोबत खास क्षण घालवले. चाहत्यांकडून मिळालेल्या प्रेमाचा आणि भेटवस्तूंचा तिने मनापासून स्वीकार केला. तसेच अनेक चाहत्यांसोबत फोटो काढत तिने त्यांच्याशी संवादही साधला. ऐश्वर्याचा नम्र स्वभाव आणि चाहत्यांसाठी असलेले प्रेम नेटकऱ्यांच्या विशेष पसंतीस उतरले आहे.

### बॉडीगार्डने वयस्कर महिलेला रोखले तर...

यानंतर एक वयस्कर महिला पुढे आली आणि ती ऐश्वर्या रायचे कौतुक करत होती. बॉडीगार्डने तिला बाजूला करण्याचा प्रयत्न केला असता ऐश्वर्याने बॉडीगार्डला सांगितले की, मी त्यांना शब्द दिला होता की मी फोटो काढेन. त्या खूप गोड आहेत, असे ऐश्वर्या राय म्हणाली. त्या महिलेने ऐश्वर्याचा हात धरला आणि ऐश्वर्या जगातली सर्वोत्तम असल्याचे म्हटले. यावर ऐश्वर्याने त्यांचे आभार मानले. ऐश्वर्या रायचे चाहत्यांप्रती असणारे हे प्रेम आणि तिचा नम्रपणा नेटकऱ्यांच्या पसंतीस उतरला आहे.

# आयुष्यमान व वय वंदना कार्ड ई-केवायसी मोहिम प्रभावीपणे राबवा...

## सर्व विभागाने समन्वयाने काम करा: जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांचे आवाहन

## २० मे ते ३० जून २०२६ या कालावधीत विशेष मोहीम...

जनसंचलन/बुलढाणा

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (-) अंतर्गत जिल्ह्यातील १०० टक्के पात्र लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड व वय वंदना कार्ड ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी युद्धस्तरावर विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. प्रत्येक पात्र नागरिकांपर्यंत आयुष्मान कार्डचा लाभ पोहोचावा यासाठी संबंधित सर्व विभागांनी समन्वयाने काम करून मोहिम प्रभावीपणे राबवावी, असे आवाहन डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृहात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महसूल विभाग व पंचायत विभागाची आढावा बैठक पार पडली. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते, जिल्हा पुरवठा अधिकारी रुपेश बिजेवार, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले तसेच ऑनलाईनव्दारे सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करण्यासाठी ग्रामस्तरावर जनजागृती, विशेष शिबिरे आणि विभागीय समन्वय वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या. २० मे ते ३० जून २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या विशेष मोहिमेदरम्यान प्रत्येक पात्र नागरिकाला योजनांचा लाभ मिळेल यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने व तत्परतेने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. देवरे यांनी दिले. ही मोहीम अधिक सुटसुटीत आणि प्रभावी व्हावी यासाठी त्याची विभागणी दोन टप्प्यांत करण्यात आली आहे. पहिला टप्पा २५ मे ते ४ जून २०२६ या कालावधीत प्रत्येक तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत () येणाऱ्या ५० टक्के ग्रामपंचायतींमध्ये विशेष शिबिरे होतील. यासोबतच सर्व ५० प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि २८२ उपकेंद्र स्तरावर शिबिरांचे आयोजन केले जाईल. तालुका फिल्ड टीममार्फत दररोज या कामाचे क्षेत्रीय सुपरव्हिजन केले जाईल. दुसरा टप्पा १० जून ते २० जून २०२६ या काळात उर्वरित ५० टक्के ग्रामपंचायतींमध्ये शिबिरे घेतली जातील. तसेच पहिल्या टप्प्यात सुटलेल्या किंवा प्रलंबित राहिलेल्या लाभार्थ्यांचा पाठपुरावा (-) करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र स्तरावर पुन्हा शिबिरे आयोजित केली जातील.

ग्रामपातळीवर विशेष शिबिरे व दुर्गम भागासाठी विशेष व्यवस्था : नागरिकांच्या सोयीसाठी ग्रामपंचायत कार्यालय, सीएससी () केंद्र, उपकेंद्र, शाळा परिसर आणि अंगणवाडी केंद्रांची निवड शिबिरांसाठी करण्यात आली आहे. या मोहिमेत आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी, ग्रामसेवक आणि स्वस्त धान्य दुकानदार यांचा सक्रिय सहभाग निश्चित करण्यात आला आहे. हे सर्व कर्मचारी लाभार्थ्यांना वेळेत माहिती देऊन शिबिरात उपस्थित राहण्यासाठी प्रवृत्त करतील. दुर्गम तसेच आदिवासी भागातील नागरिकांसाठी इंटरनेटची अडचण भासू नये, म्हणून ऑफलाइन सुविधा तसेच व्ही-सॅट () किंवा जिओ हॉटस्पॉट ( ) द्वारे पर्यायी इंटरनेट व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. या भागांना तालुका फिल्ड सुपरव्हिजन टीम प्राधान्याने भेट देणार आहे. या विशेष शिबिरांचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी येताना सोबत आधार कार्ड, रेशन कार्ड, आधारशी संलग्न () असलेला मोबाईल क्रमांक आणणे आवश्यक आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी दिली.

ज्या नागरिकांचा मोबाईल क्रमांक आधार कार्डशी जोडलेला नसेल, त्यांनी तो जवळच्या सीएससी () केंद्रावर जाऊन तात्काळ अपडेट करून घ्यावा. जिल्ह्यातील सर्व पात्र नागरिकांनी या विशेष मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन आपले आयुष्मान कार्ड आणि वय वंदना कार्ड ई-केवायसी तात्काळ पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले आहे.

# मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण अभियान सुरू

जनसंचलन/बुलढाणा

भारत निवडणूक आयोगाने भारतीय संविधानाच्या कलम ३२४ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून देशभरात मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण ( - ) अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेच्या तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रासह १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांचा समावेश करण्यात आला असून राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येणार आहे. राज्यात मागील दोन दशकांपासून केवळ विशेष संक्षिप्त पुनरिक्षण होत होते. विशेष सखोल पुनरिक्षण मात्र २००२-०४ नंतर झालेले नव्हते. दरम्यानच्या काळात शहरीकरण, स्थलांतर आणि नव्या नोंदणीमुळे मतदार याद्यांमध्ये दुबार नावे, मृत व्यक्तींची नावे किंवा त्रुटी निर्माण झाल्याची शक्यता लक्षात घेऊन ही व्यापक मोहीम हाती घेण्यात आली आहे. संविधानाच्या कलम ३२६ नुसार मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी संबंधित व्यक्ती भारतीय नागरिक असणे आणि वयाची १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. त्यानुसार मतदारांच्या नागरिकत्वाची खातरजमा करण्याची जबाबदारी आयोगावर आहे. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० मधील कलम २१ नुसार आयोगाला विशेष सखोल पुनरिक्षण करण्याचे अधिकार आहेत. राज्यातील १ लाख २५३ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी () या मोहिमेत सहभागी होणार असून राजकीय पक्षांनी नियुक्त केलेले मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी () त्यांना सहकार्य करणार आहेत. राज्यात सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेचा विचार करून महाराष्ट्रासाठी स्वतंत्र वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. या कालावधीत घरोघरी भेट देऊन पूर्वभरलेले गणना प्रपत्र (- ) मतदारांना वितरित करतील. या प्रपत्रात विद्यमान मतदार माहिती तसेच संबंधित मतदार किंवा त्यांच्या आई-वडील अथवा आजी-आजोबांच्या २००२-०४ मधील मतदार यादीतील नोंदीचा तपशील उपलब्ध असेल. मतदारांना नविन छायाचित्र सादर करण्याची सुविधाही उपलब्ध राहणार आहे. गृहभेटीदरम्यान घर बंद आढळल्यास किमान तीन वेळा भेट देणार असून त्याची नोंद ठेवण्यात येणार आहे. मतदारांना गणना प्रपत्र ऑनलाईन पद्धतीनेही भरता येणार आहे. प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध झाल्यानंतर ज्या मतदारांच्या नोंदींची जुळवणी होणार नाही किंवा त्रुटी आढळतील, त्यांना नोटिसा देण्यात येतील. अशा मतदारांची यादी स्थानिक स्वराज्य संस्था कार्यालय, तहसील कार्यालय तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. भारत निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, आधार कार्ड हे केवळ ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरले जाईल; मात्र आधार कायद्यानुसार ते नागरिकत्वाचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी () नियुक्त करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यात आतापर्यंत १ लाख १३ हजार ५५८ नियुक्त करण्यात आले असून प्रत्येक मतदान केंद्रावर अधिकाधिक प्रतिनिधी नियुक्त करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. यासंदर्भात लवकरच मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठका आयोजित करण्यात येणार आहेत.

# जिल्ह्यात इंधनाचा मुबलक साठा; १८ लाख ८३ हजार लिटर इंधन दाखल

## अफवांवर विश्वास ठेवू नका, अतिरिक्त खरेदी टाळा : जिल्हाधिकारी यांचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा




जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच आवश्यकतेपुरतेच इंधन खरेदी करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. दि. २५ मे २०२६ रोजी विविध ऑईल कंपन्यांकडून जिल्ह्याला एकूण १८ लाख ८३ हजार लिटर इंधन साठा प्राप्त झाला आहे. नागरिकांनी अनावश्यक गर्दी टाळावी, अतिरिक्त स्वरूपात इंधन साठवू नये आणि गरजेपुरतेच पेट्रोल-डिझेल खरेदी करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले आहे.

प्राप्त माहितीनुसार, भारत पेट्रोलियम () कडून १ लाख १० हजार लिटर पेट्रोल व ३ लाख ५० हजार लिटर डिझेल, हिंदुस्तान पेट्रोलियम () कडून १ लाख ४० हजार लिटर पेट्रोल व ४ लाख ३ हजार लिटर डिझेल, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन () कडून ४ लाख ५० हजार लिटर पेट्रोल व ४ लाख ३० हजार लिटर डिझेल प्राप्त झाले आहे, असे एकूण जिल्ह्याला पेट्रोल ७ लाख तर डिझेल ११ लाख ८३ हजार लिटर इंधन साठा प्राप्त झाला आहे. पुढील काळातही दररोज इंधन साठा जिल्ह्याला प्राप्त होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्हा प्रशासन सर्व ऑईल कंपन्या तसेच पेट्रोल पंप चालकांच्या सतत संपर्कात असून जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवर पेट्रोल आणि डिझेल सुरळीतपणे उपलब्ध होत आहे. इंधन वितरण सुरळीत राहावे यासाठी पोलीस प्रशासनालाही आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिवसेना, राष्ट्रवादी अडली, विधानपरिषदेचा तिढा कसा सुटणार?

## मुख्यमंत्री फडणवीसांनी मांडली भूमिका...

**वृत्तसंस्था मुंबई**

मुंबईः शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आग्रही भूमिकेमुळे महायुतीत विधान परिषद निवडणुकीतील जागावाटपाचा प्रश्न अद्याप निकाली निघालेला नाही. छत्रपती संभाजीनगर, नाशिक आणि पुणे या मतदारसंघांवरून महायुतीत रस्सीखेच सुरू आहे. या तीन जागांवर मित्र पक्षांशी चर्चा सुरू असल्याची माहिती देतानाच, आम्ही एकत्र बसून चर्चेतून मार्ग काढ, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी व्यक्त केला. विधान परिषदेच्या १७ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणुकीसाठी सोमवारपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली असली तरी महायुतीचे जागावाटप अद्याप निश्चित झालेले नाही. भाजपने शिवसेनेला तीन, तर राष्ट्रवादीला दोन जागा देऊ केल्या आहेत. मात्र, सेनेने सात आणि राष्ट्रवादीने पुण्याच्या जागेसाठी आग्रह धरला आहे. ङ्कजागावाटपाबाबत मित्रपक्षांशी चर्चा सुरू आहे. शिवसेनेशी विधान परिषदेच्या नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर, तर राष्ट्रवादीसोबत पुण्याच्या जागेबाबत चर्चा केली जात आहे. अजून मार्ग निघालेला नाही. मात्र, आम्ही तिघेही एकत्र बसून मार्ग काढू. या चर्चेतून नक्कीच मार्ग निघेल असा मला विश्वास आहेफ, असेही त्यांनी नमूद केले.

आंबेनळी घाटात गाडी दरीत कोसळून झालेली दुर्घटना अतिशय दुर्देवी आहे. यासंबंधी पहिल्यांदा कुणालाही माहिती नव्हती. पण, हे बेपत्ता असल्याचे लक्षात आल्यानंतर शोध घेण्यास सुरूवात केली. पुढील कारवाई चालू आहेफ, असे फडणवीस म्हणाले. नीट पेपरफुटी प्रकरणामुळे नैराश्यातून आत्तापर्यंत तीन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या असल्याबद्दल विचारले असता, ङ्कज्या लोकांनी नीट पेपरमध्ये मिठाचा खडा टाकण्याचा प्रयत्न केला, त्यांनी विद्यार्थ्यांसोबत प्रचंड अन्याय केला आहे. केंद्र सरकार आणि तपास यंत्रणेने याची पाळेमुळे खणून काढत अनेकांना अटक केली आहे. त्यामुळे पुढील नीटची परिक्षा अतिशय योग्य पद्धतीने होईल. कुणालाही गडबड करता येणार नाहीफ, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.



इंधन तुटवड्यावरून राज्यात निर्माण झालेल्या परिस्थितीवर विरोधकांनी टीका केली आहे. याकडे लक्ष वेधले असता, सध्या जागतिक संकट आहे. जगात अनेक देशांनी पेट्रोल-डिझेलची आणीबाणी घोषित केली आहे. काही ठिकाणी दोन-दोन दिवस लॉकडाऊन आहे. तरीही पेट्रोल-डिझेल देण्याचा प्रयत्न आपण करतो आहोत. काही ठिकाणी लोक जमा झाल्याने कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली आहे. काही ठिकाणी हिंसक प्रवृत्ती दिसत आहे. त्यामुळे विनाकारण हिंसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या आहेत असे फडणवीस यांनी सांगितले.

# संतांच्या सुरक्षेचा प्रश्न पेटला! - बुलढाण्यात जैन समाज आक्रमक; राष्ट्रपतींपासून पंतप्रधानांपर्यंत धडक निवेदन

**जनसंचलन/बुलढाणा**

मध्यप्रदेशातील रीवा येथे घडलेल्या पूज्य आर्यिका माताजी दुर्घटनेनंतर देशभरातील जैन समाजात संतापाची लाट उसळली असून, बुलढाणा येथील दिगंबर जैन संस्था आता थेट आंदोलनाच्या भूमिकेत आली आहे. विहाररत जैन साधू-संत सुरक्षित नसतील तर देशातील अध्यात्म सुरक्षित कसे? असा थेट सवाल उपस्थित करत संस्थेने राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्याकडे कठोर कारवाईची मागणी केली आहे. दि. २५ मे रोजी पाठविण्यात आलेल्या निवेदनात, २० मे रोजी रीवा जिल्ह्यात घडलेल्या दुर्घटनेत पूज्य आर्यिकांचे निधन झाल्याचा उल्लेख करत संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. या घटनेमुळे जैन समाजात तीव्र अस्वस्थता निर्माण झाली असून, संतांच्या सुरक्षेबाबत शासन गंभीर नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, जैन साधू-संत हे अहिंसा, संयम आणि तपश्चर्येचे प्रतीक आहेत.



ते कोणतीही शासकीय सुरक्षा न घेता पायी विहार करतात. अशा परिस्थितीत त्यांच्या जीविताची जबाबदारी शासनाने स्वीकारली पाहिजे. देशभरातील विहाररत संतांसाठी स्वतंत्र राष्ट्रीय संत सुरक्षा धोरण लागू करून विशेष सुरक्षा यंत्रणा उभारावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानफमध्ये बुलढाण्याचा ऐतिहासिक डंका

**जनसचलन/ ज.जामोद**

महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात बुलढाणा जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी करत जिल्ह्याचा मान उंचावला आहे. जळगाव जामोद तालुक्यातील सुलज ग्रामपंचायतीने या अभियानात सर्वोच्च गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि राज्यमंत्री योगेश कदम यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या अभियानात शाश्वत स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, शुद्ध पाणीपुरवठा, १००% कर वसुली आणि ई-गव्हर्नन्स अशा निकषांवर ग्रामपंचायतींचे गुणांकन करण्यात आले. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यात हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला. जळगाव जामोद तालुक्यातील १२ ग्रामपंचायतींनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. सुलज ग्रामपंचायतीने नियोजनबद्ध कामकाज, स्वच्छता अभियान, डिजिटल शाळा सुशोभीकरण आणि ग्रामपंचायत कार्यालयाच्या आधुनिकीकरणातून विशेष छाप पाडली. गटविकास अधिकारी संदीपकुमार मोरे आणि विस्तार अधिकारी राजेंद्र कोलते यांच्या सातत्यपूर्ण भेटी व मार्गदर्शनामुळे गाव पातळीवर मोठा बदल घडून आला. सरपंच लता टापरे, ग्रामविकास अधिकारी कविता जवंजाळकर, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, शिक्षक, बचतगट, आशा वर्कर्स आणि ग्रामस्थ यांच्या सामूहिक प्रयत्नातून हे यश साध्य झाले. तपासणी समितीने दिलेल्या अहवालानुसार सुलज ग्रामपंचायतीला १५ लाख रुपयांचे बक्षीस मिळण्यास पात्र ठरले आहे. या यशामुळे सुलज ग्रामपंचायत राज्यस्तरासाठी पात्र ठरली असून जळगाव जामोद तालुक्याच्या विकासाची नवी ओळख निर्माण झाली आहे. ही सामूहिक मेहनत आणि एकजुटीचा विजय आहे,फ्फ अशी प्रतिक्रिया गटविकास अधिकारी संदीपकुमार मोरे यांनी दिली. या ऐतिहासिक यशामुळे बुलढाणा जिल्ह्याने राज्यात आपली वेगळी छाप उमटवली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८